महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८

# महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम, १९९५

(दिनांक २४ एप्रिल, २००३ पर्यंत सुधारित)

## Maharashtra Act No. VIII of 1995

# The Maharashtra Prevention of Defacement of Property Act, 1995

*(As modified upto 24th April, 2003)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामुग्री महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित केले.

२००६

(किंमत : रु. ३-००)

# महाराष्ट्र मालमत्तेच्या विरूपणास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम, १९९५

## अनुक्रमणिका

उद्देशिका


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. | २ |
| २. | व्याख्या. | २ |
| ३. | विरूपणाबद्दल शास्ती. | २ |
| ४. | अपराध दखली असणे. | ३ |
| ५. | लिखाण पुसून टाकणे, इत्यादीचा राज्य शासनाचा अधिकार. | ३ |
| ६. | क्षतिपूर्ती. | ३ |
| ७. | अधिनियम इतर कायद्यांवर अधिभावी असणे. | ३ |
| ८. | अडचणी दूर करणे. | ३ |
| ९. | सन १९९५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १ याचे निरसन व व्यावृत्ती. | ३ |

# सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८

## [महाराष्ट्र मालमत्तेच्या विरूपणास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम, १९९५][१]

[२९ एप्रिल, १९९५ रोजी, राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्र"** भाग चार मध्ये दिनांक २ मे, १९९५ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिध्द केलेला]

**मालमत्तेच्या विरूपणास प्रतिबंध करण्याची आणि त्याच्याशी संबंधित किंवा आनुषंगिक बाबींची तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

**आणि ज्याअर्थी,** जनतेला दृष्टिगोचर असतील अशा कोणत्याही मालमत्तेच्या किंवा जागेच्या विरूपणास प्रतिबंध करण्यासाठी तरतूद करण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा आनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता, विशेष कायदा असावा म्हणून महाराष्ट्राच्या राज्यपालांनी त्वरित कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झाली होती; आणि म्हणून, त्यांनी, दिनांक १८ जानेवारी, १९९५ रोजी महाराष्ट्र मालमत्तेच्या विरूपणास प्रतिबंध करण्याकरिता अध्यादेश, १९९५ हा प्रख्यापित केला होता ;

१९९५ चा महा. अध्या. १

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता महाराष्ट्र शासन राजपत्र, १९९५ सर्वसाधारण, भाग-पाच, पृष्ठ ४, दिनांक २५ मार्च, १९९५ पहा.

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सेहेचाळीसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :-

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र मालमत्तेच्या विरूपणास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम, १९९५, असे म्हणता येईल.

(२) तो, दिनांक १८ जानेवारी, १९९५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या. **२.** या अधिनियमामध्ये, याचा अर्थ संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,--

(क) "जाहिरात" म्हणजे कोणतीही मुद्रित, चुक्रमुद्रित, टंकलिखित किंवा लेखी नोटीस, दस्तऐवज, कागद किंवा कोणतेही अक्षर, शब्द, चित्र, चिन्ह किंवा दृश्य प्रतिरूपण यांचा समावेश असलेली कोणतीही अन्य गोष्ट, असा आहे ;

(ख) "विरूपण" यामध्ये बाह्य स्वरूपास किंवा सौंदर्यास हानी पोचवणे किंवा त्यात हस्तक्षेप करणे, नुकसान पोचवणे, विद्रूप करणे, खराब करणे किंवा कोणत्याही प्रकारे क्षती पोचवणे यांचा समावेश होतो आणि "विरूप करणे" ह्या शब्दाचा अन्वयार्थ तद्नुसार लावला जाईल; --

(ग) "जनतेला दृष्टिगोचर असेल अशी जागा" यामध्ये कोणत्याही सार्वजनिक जागेमध्ये असलेल्या किंवा तेथून जाणाऱ्या व्यक्तीला दिसू शकेल अशी कोणतीही खाजगी जागा किंवा इमारत, स्मारक, शिल्प, पुतळा, खांब, भिंत, कुंपण, झाड किंवा यंत्रक यांचा समावेश होतो ;

(घ) "सार्वजनिक जागा" याचा अर्थ, ज्या ठिकाणी लोकांना प्रवेश करण्याची परवानगी देण्यात आली आहे किंवा ये-जा करण्याचा हक्क आहे अथवा त्यांना ज्यामधून जाण्याचा हक्क आहे अशी (मार्ग, रस्ता किंवा वाट-मग ती रहदारीची असो वा नसो-आणि उतरवण्याची जागा यांसह) कोणतीही जागा, असा आहे.

विरूपणाबद्दल शास्ती. **३.** जो कोणी, स्वत: किंवा कोणत्याही अन्य व्यक्तीच्या मार्फत जनतेला दृष्टिगोचर असेल अशा कोणत्याही जागेचे विरूपण करील त्यास अपराध सिध्द झाल्यानंतर, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कारावासाची किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील :

परंतु, या कलमातील कोणतीही गोष्ट, जी जाहिरात,--

(एक) या बाबतीत अशा क्षेत्रावर अधिकारिता असणाऱ्या स्थानिक प्राधिकरणाच्या लेखी परवानगीने प्रदर्शित केलेली असेल;

(दोन) कोणत्याही इमारतीमध्ये चालविला जाणारा व्यापार, व्यवसाय किंवा धंदा यांच्या संबंधातील असेल व ती त्या इमारतीच्या खिडकीमध्ये प्रदर्शित केलेली असेल; किंवा

(तीन) जिच्यामध्ये किंवा जिच्यावर अशी जाहिरात प्रदर्शित करण्यात आलेली असेल त्या जमिनीमध्ये किंवा इमारतीमध्ये चालविला जाणारा व्यापार, व्यवसाय किंवा धंदा यांच्याशी किंवा अशी जमीन किंवा इमारत किंवा त्यातील कोणत्याही चीजवस्तू कोणत्याही प्रकारे विकण्याशी किंवा भाड्याने देण्याशी किंवा तिच्यामध्ये अथवा तिच्यावर किंवा तिच्यामध्ये करण्यात येणारी कोणतीही विक्री, करमणूक किंवा सभा यांच्याशी संबंधित असेल; किंवा

(चार) जिच्यामध्ये किंवा जिच्यावर जाहिरात प्रदर्शित केलेली असेल अशा जमिनीच्या किंवा इमारतीच्या नावाशी अथवा अशा जमिनीच्या किंवा इमारतीच्या मालकांच्या किंवा भोगवटादाराच्या नावाशी संबंधित असेल; किंवा

(पाच) रेल्वे प्रशासनाच्या कामकाजाशी संबंधित असेल आणि ती कोणत्याही रेल्वे स्टेशनाच्या आत किंवा रेल्वे प्रशासनाच्या कोणत्याही भिंतीवर किंवा अन्य मालमत्तेवर प्रदर्शित केलेली असेल;

अशा जाहिरातीला लागू होणार नाही.

**अपराध दखली असणे.**

४. या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेला अपराध हा दखली असेल.

**लिखाण पुसून टाकणे, इत्यादीचा राज्य शासनाचा अधिकार.**

५. कलम ३ च्या तरतुदींना बाध न आणता, राज्य शासन, जनतेला दृष्टिगोचर असलेली कोणतीही जागा कोणत्याही विरूपणापासून मुक्त करण्याकरिता, तीमधील कोणतेही लिखाण पुसून टाकण्याकरिता किंवा कोणतीही उभारणी किंवा लावलेल्या गोष्टी (फिक्सेशन) काढून टाकण्याकरिता, आवश्यक त्या उपाययोजना करण्यास सक्षम असेल. असे विरूपण काढून टाकण्याकरिता किंवा कोणतेही लिखाण पुसून टाकण्याकरिता किंवा कोणतीही उभारणी किंवा लावलेल्या गोष्टी (फिक्सेशन) काढून टाकण्याकरिता, राज्य शासनाकडून करण्यात आलेला खर्च, अशा अपराधाबद्दल दोषी ठरलेल्या व्यक्तीकडून कलम ३ अन्वये वसूल करण्यात येईल आणि जर तो देण्यात आला नाही तर, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याच्या तरतुदींअन्वये जमीन महसुलाची थकबाकी म्हणून अशा व्यक्तीकडून तो वसूल करण्यात येईल. [१९६६ चा महा. ४१.]

**क्षतिपूर्ती.**

६. या अधिनियमान्वये, सद्‌भापूर्वक किंवा लोकहितार्थ करण्यात आलेल्या किंवा करण्याचा हेतू असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल, राज्य शासन, कोणतेही स्थानिक प्राधिकरण किंवा व्यक्ती यांच्याविरूध्द कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेविषयक कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

**अधिनियम इतर कायद्यांवर अधिभावी असणे.**

७. त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यात एतद्‌विरुध्द काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमातील तरतुदी अंमलात येतील.

**अडचणी दूर करणे.**

८. या अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यात कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, परिस्थितीनुसार अशी अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाची उद्दिष्टे आणि प्रयोजने यांच्याशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट आदेशाद्वारे करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

**सन १९९५ चा महाराष्ट्र आध्यादेश क्रमांक १ याचे निरसन व व्यावृत्ती.**

[१९९५ चा महा. अध्या. १.] ९. (१) महाराष्ट्र मालमत्तेच्या विरूपणास प्रतिबंध करण्याकरिता अध्यादेश, १९९५ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा करण्यात आलेली कोणतीही कार्यवाही ही, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींअन्वये, यथास्थिति, करण्यात आलेली गोष्ट किंवा कार्यवाही आहे असे समजण्यात येईल.

------------